## तुला काय सांगू, तुला काय बोलू ?

तुला काय सांगू, तुला काय बोलू ?
तुझ्या पाहण्याचे, किती आरोप झेलू ?
तुझे काय जाते ? तुला काय त्याचे ?
गुलाबी गुन्ह्यांचे, कसे गूढ उकलू?

इशारे तुझे, जसे बेबंद वारे
नकोसे, भणाणे तरी अंगी शहारे
मदहोश श्वासांचे उरी घाव गहिरे
पुरावे संपले तरी खटलाही चालू ..
गुलाबी गुन्ह्यांचे कसे गूढ उकलू?

तुझे ओळखीचे, जीवघेणे उसासे
स्वप्नात देऊन आलिंगन जरासे
सावरून मी, मला तरी गुन्हेगार भासे
नजरा कशा बोचऱ्या, पापण्यात पेलू ?
गुलाबी गुन्ह्यांचे कसे गूढ उकलू?

तुला काय सांगू तुला काय बोलू ?
तुझ्या पाहण्याचे किती आरोप झेलू ?
तुझे काय जाते ? तुला काय त्याचे ?
गुलाबी गुन्ह्यांचे कसे गूढ उकलू?

**----संध्या रानडे**